
# अण्णा भाऊ साठे

## व्यक्ती, साहित्य आणि समीक्षा




संपादक

डॉ. राजकुमार मस्के

डॉ. लहू वाघमारे

Scanned with OKEN Scanner

## संपादक मंडळ

अतिथी संपादक

**यशवंत मनोहर**

संपादक

**डॉ. राजकुमार मस्के**

**डॉ. लहू वाघमारे**

सह संपादक

**डॉ. जयद्रथ जाधव**

**प्रा. अमोल पगार**

**डॉ. मारोती कसाब**

**डॉ. दुष्यंत कटारे**

कार्यकारी संपादक

**डॉ. चंद्रकांत वाघमारे**

**डॉ. नारायण कांबळे**

**संपादक मंडळ**

डॉ. गणेश चंदनशिवे
डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे
डॉ. सोमनाथ कदम
डॉ. ममता इंगोले
प्रा. नयन राजमाने
डॉ. पद्माकर पिटले
डॉ. संतोष हंकारे
डॉ. मारोती गायकवाड
डॉ. ओमशिवा लिगाडे
डॉ. सा. द. सोनसळे
डॉ. अरविंद कदम
प्रा. आरती गायकवाड
प्रा. रवींद्र बोरसे
डॉ. संजय कसाब
श्रीमती मधुबाला हुडगे
सौ. नीता मोरे


Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-81-937477-0-4


| अ.क्र. | लेख / लेखकाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| ८३ | लोकशाहीर अण्णा भाऊ साठे<br>श्रीमती सुरेखा मल्लिकार्जून कानडे | ५६१-५६८ |
| ८४ | लोकनाट्यकार अण्णा भाऊ साठे<br>विद्या मनोहर कांबळे | ५६९-५७३ |
| ८५ | एक विद्रोही वादळ : अण्णा भाऊ साठे<br>प्रा. विजय नागनाथ तोंडारे | ५७४-५७७ |
| ८६ | अण्णा भाऊ साठे यांच्या लोकनाट्यातील आशयाचे स्वरूप<br>स्वाती नरसिंग पोतवळे | ५७८-५८३ |
| ८७ | अण्णा भाऊ साठे यांच्या स्त्रीविषयक विचारांची प्रासंगिकता<br>प्रा. सौ. शिलादेवी पांडुरंग कांबळे | ५८४-५८८ |
| ८८ | अण्णा भाऊ साठे यांचे जीवनचरित्र आणि कार्य<br>भगवान रोकडोबा जाभाडे | ५८९-५९२ |
| ८९ | अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांमधील स्त्रियांचा सन्मान आणि लढा : एक विलक्षण अनुभव<br>सातलिंग काशिनाथ गौंड | ५९३-५९६ |
| ९० | शाहीर अण्णा भाऊ साठे यांचा जीवनप्रवास<br>श्री. ऋषिकेश वैजनाथ शिरुरे | ५९७-६०१ |
| ९१ | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवादी प्रेरणा<br>डॉ. के. एस. भदाडे | ६०२-६०४ |
| ९२ | अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीचे स्वरूप आणि विचार<br>प्रा. सौ. एस. एस. कांबळे | ६०५-६११ |
| ९३ | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिक दृष्टिकोन<br>प्रा. ज्योती रमेश शंकपाळे | ६१२-६१६ |
| ९४ | फकिरा : अपरिचित समाज दर्शन घडविणारी कादंबरी<br>डॉ. गोविंद उफाडे | ६१७-६१९ |
| ९५ | साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे<br>शंकर सोनकांबळे | ६२०-६२३ |
| ९६ | अण्णा भाऊ साठे यांचे कादंबरीलेखन<br>डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे | ६२४-६३० |



Scanned with OKEN Scanner

# लोकनाट्यकार अण्णा भाऊ साठे

प्रा. विद्या मनोहर कांबळे
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

१ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे भाऊराव सिद्धोजी साठे आणि वालुबाई यांच्या पोटी तुकाराम भाऊराव साठे यांचा जन्म झाला. तुकारामच्या नावाचा अपभ्रंश करून 'तुक्या' झाला. सर्वजण 'तुक्या' म्हणून लागले; पण वालुबाईला हे नाव पसंत नसल्याकारणाने तिने लहान भावंडांना 'अण्णा' म्हणा असे सांगितले आणि तुकारामला 'अण्णा भाऊ' संबोधू लागले. तेव्हापासून अण्णा भाऊ हे नाव प्रचलित झाले. कौटुंबिक परिस्थिती हलाखीची. त्यातच कुटुंबाचा भार, जबाबदारी, त्यामुळे कुटुंबप्रमुख अण्णा भाऊ साठे हे वाटेगावहून मुंबईला प्रस्थान करून आले आणि त्यांच्या कामगारचळवळीला प्रारंभ झाला.

दीड दिवस शिक्षण घेऊन अण्णा भाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, १४ लोकनाट्य, १ नाटक, १ प्रवासवर्णन आणि २१ कथासंग्रह इ. साहित्याची निर्मिती केली. मुंबईला जाऊन कामगार संघटना आणि कष्टकऱ्यांचे दुःख मांडून व जाणून तेच अनुभव घेऊन कामगार संघटना निर्माण केली आणि लोकशाहीर म्हणून प्रसिद्ध झाले. गीतरचना, पोवाडे, लोकनाट्याची रचना करून जनसामान्यांना नवीन दिशा देऊन जागे करण्याचे काम अण्णा भाऊ साठे यांनी केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अण्णा भाऊंनी सुरू केलेल्या तमाशावर बंदी आणण्याचे कार्य केले गेले. त्याला न जुमानता, जनसामान्यांचे प्रबोधन करण्यासाठी त्यांनी 'लालबावटा कलापथका'ची स्थापना केली आणि बंदीला सडेतोड उत्तर दिले. अण्णा भाऊ साठे यांचे कार्य जेवढे संघटनांच्या माध्यमातून दिसते, तेवढेच साहित्याच्या क्षेत्रातही दिसते. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्या, कथा, नाटक, प्रवासवर्णन, लोकनाट्य यांतूनही ते समाजजागृती आणि वास्तव समाजजीवन साकारलेले दिसून येते आणि साहित्यसृष्टीला समृद्धता आणण्याचे कार्य त्यांनी केले आहे. अण्णा भाऊ साठे हे हाडाचे कथाकार म्हणून जसे ओळखले जात, तसेच लोकनाट्याचे जनक म्हणूनही ते परिचित आहेत. कारण



Scanned with OKEN Scanner

 ISBN : 978-81-937477-0-

पारंपरिकतेला तडा देऊन नवीन उभारणी करणारे अण्णा भाऊ साठे लोकनाट्यातून प्रबोधन करतात. खटकेबाजपणातून माणसाचे संघटन करण्याचे यश अण्णा भाऊंच्या लोकनाट्यामुळे आलेले दिसून येते.

'तमाशा' हा महाराष्ट्राच्या लोककलेतील एक उत्कृष्ट लोककलाप्रकार' परंतु पारंपरिक 'तमाशा' हे नाव न देता, त्याला 'लोकनाट्य' हे नाव देऊन जनसामान्यांत ते नाव रूजविण्याचे कार्य अण्णा भाऊ साठे यांनी केले. अण्णा भाऊ यांनी एकूण १४ लोकनाट्ये लिहिली. त्यात 'अकलेची गोष्ट', 'देशभक्त घोटाळे', 'निवडणुकीत घोटाळे', 'शेटजीचं इलेक्शन', 'बेकायदेशीर', 'माझी मुंबई' अर्थात 'मुंबई कुणाची?', 'मूक मिरवणूक', 'लोकमंत्र्याचा दौरा', 'पेंग्याचं लगीन', 'दुष्काळात तेरावा', 'बिलंदर बुडवे', 'कलंत्री' आणि 'पुढारी मिळाला' अशी चौदा लोकनाट्ये त्यांच्या नावावर आहेत. तमाशाचे अण्णा भाऊंनी लोकनाट्य असे नामांतर केले आणि सामाजिक प्रश्नाला कथानक बनवून लोकनाट्याला हत्यार बनवून प्रबोधनाचे कार्य केले. म्हणून अण्णा भाऊ साठे आणि त्यांचे लोकनाट्य हे मराठी साहित्यसृष्टीला लाभलेली मोलाची देणगी आहे.

अण्णा भाऊ साठे यांनी बहुजन समाजाच्या मनोरंजनाचा तमाशा आपल्या सामाजिक आशयाच्या लोकनाट्यासाठी आणला. त्यासाठी पारंपरिक तमाशाचे अंतर्बाह्य स्वरूप बदलले. त्यातील लावणी तशीच ठेवली. परंपरेने आलेली गौळण मात्र बदलली. सोंगाड्या स्वीकारला, तर पारंपरिक नाची नाकारली. नाट्यमय वग तसेच ठेवून त्यात सामाजिक आशय भरला. सोंगाड्या हा तमाशातील अत्यंत लवचिक असा विषय आणि त्याचा लवचिक अभिनय, हरहुन्नरी व हजरजबाबीपणामुळे प्रसिद्ध झाला. रसिकांना खळखळून हसवणारा, विनोद करून तमाशात प्राण आणणारा आणि प्रबोधन करण्यास उपहास करून उपरोधिकपणे प्रमुख विषयापर्यंत आणणारा, प्रेक्षकांना-रसिकांना भरभरून हसवणारा, ओरखडे ओढणारा हा सोंगाड्या प्रेक्षकांच्या-रसिकांच्या मनावर राज्य करत असतो. हा सोंगाड्या अण्णा भाऊंच्या लोकनाट्यातील रंगात खेळ भरतो आणि शैलीदार उपहास करतो.

अण्णा भाऊंनी सामाजिक आशयाची अनेक लोकनाट्ये लिहिली आणि स्वतःच हातात डफ घेऊन ते रंगमंचावर उभे राहत. स्वतः रचनाकार रंगमंचावर उभा राहिलेला पाहून, प्रेक्षक-रसिकवर्ग एकदम आनंदी होत असे आणि प्रसन्न होऊन दाद देत असे. अण्णा भाऊ साठे यांचे १९४५ मध्ये लिहिलेले 'अकलेची गोष्ट' हे पहिले लोकनाट्य. 'जानबा' शेतकऱ्यांच्या जीवनाची, कष्टाची गोष्ट यातून अण्णा भाऊंनी मांडली आहे. 'जानबा' शेतकऱ्यांचे कुटुंब, त्याची झालेली परवड, सरकारच्या

बेपर्वाईमुळे आणि महागाईमुळे त्रस्त झालेला 'जानबा' आणि व्यापारी व सावकार मिळून त्याला कसे फसवितात आणि त्याला कसे मूर्ख समजतात, याची कहाणी यात मांडली आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळावा, ही भूमिका मांडण्यासाठी ह्या लोकनाट्याची निर्मिती झाली आणि 'समता' या मूल्याच्या प्रसारासाठी अण्णा भाऊ साठे यांनी या लोकनाट्याची निर्मिती केली आहे.

'शेटजीचं इलेक्शन' या लोकनाट्यातून निवडणुका आल्यानंतर नेत्यांची आश्वासने आणि कृतिशून्यतायाची प्रचिती मगरचंदच्या वर्तनातून येते. शेतकऱ्यांची मुस्कटदाबी केलेल्या मगरचंदला प्रश्न केला जातो की, शेतकऱ्यांच्या न्याय-हक्कांचे काय? पोटाला पोटभर भाकरी देणार काय? बळकावलेल्या जमिनी परत करणार काय? यावर सर्व नेते उत्तर न देताच पळून जातात. शेतकऱ्यांचा हा प्रश्न, वास्तवतेचे चित्रण आणि नेत्यांचे पलायन हे मगरचंदच्या भूमिकेतून दिसून येते. याची मांडणी या लोकनाट्यामधून अण्णा भाऊ साठे यांनी केली आहे.

'बेकायदेशीर' या लोकनाट्यात राजकीय डावपेच, गिरणीमालकाचे राजकारण आणि कामगारांचा संप बेकायदेशीर ठरविल्याने कामगारांनी केलेला संघर्ष आणि त्यात कामगारांचा झालेला विजय, असा या लोकनाट्याचा विषय आहे. यातील कामगारांचा संप आणि गिरणीमालकांची अरेरावी यात अण्णा भाऊ साठे यांनी मत व्यक्त केले आहे की, गिरणीकामगारांचे नुकसान गिरणी बंद पडल्याने होते; परंतु गिरणीमालकाला मात्र त्यामुळे काहीही फरक पडत नाही. हे आजच्या स्थितीतही पाहायला मिळते.

'माझी मुंबई' अर्थात 'मुंबई कुणाची?' हे अण्णा भाऊ साठे यांचे गाजलेले लोकनाट्य. यातील 'माझी मैना गावावर राहिली' हे प्रसिद्ध लावणी. यातून गुजरात, महाराष्ट्र, त्यात होरपळणारी अनेक गावे यांचे चित्रण केले आणि त्यातून ते 'जशी गरुडाला पंख आणि वाघाला नखं, तशी मुंबई मराठी मुलखाला' असे मत व्यक्त करतात; परंतु जरी मुंबई महाराष्ट्राची झाली, तरी अजूनही कारवार, बेळगाव इत्यादींचा प्रश्न तसाच आहे. म्हणून आजही ही लावणी तितकीच मनाला स्पर्श करून जाते. महाराष्ट्राचे तुकडे हे संयुक्त महाराष्ट्राच्या स्वप्नातील अडसर असल्याचे जाणवते. अण्णा भाऊंनी अशी ही महत्त्वपूर्ण मांडणी केलेली आहे.

'मूक मिरवणूक' हे जागेचा प्रश्न, बेघरांचा प्रश्न घेऊन पुढे येते. हा सामाजिक प्रश्न मांडून रेल्वेत गर्दी का? फुटपाथवर भांडणे का? याचे उत्तर जागा नाही हेच आहे, असे दिले आहे. घरांचा प्रश्न मुंबईसारख्याच ठिकाणी नाही, तर आज प्रत्येक ठिकाणी निर्माण झाला आहे. आणि तो प्रश्न मुकाट्याने सुटत नाही, तर त्यासाठी संघर्ष



Scanned with OKEN Scanner

 ISBN : 978-81-937477-0-4

आवश्यक आहे, ही बाब अण्णा भाऊ साठे यांनी महत्त्वपूर्णरीत्या नोंदविली आहे.

'लोकमंत्र्यांचा दौरा' हा राजकीय विषय घेऊन येणारे लोकनाट्य आहे. लबाड, खोटे मंत्री, स्वराज्याच्या पोकळ प्रश्नावर बोलतात, खोटी आश्वासने देतात. सर्वसामान्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत आणि मोठमोठी आश्वासने देऊन पोट भरण्याचा अट्टहास मात्र केला जातो. पोकळ आश्वासने देणाऱ्या राजकारणी लोकांच्या स्वार्थी राजकारणाचा उलगडा अण्णा भाऊ या लोकनाट्यातून करताना दिसून येतात.

'पुढारी मिळाला' हे लोकनाट्य वेगळ्या धाटणीचे आहे. यात समाजवादी पुढाऱ्यांचे धिंडवडे अण्णा भाऊ साठे काढतात. पुढारी कसा का असेना, मिळणे गरजेचे आहे. पुढाऱ्यांविषयी आपले स्पष्ट आणि परखड मत अण्णा भाऊ साठे व्यक्त करतात.

'देशभक्त घोटाळे' हे लोकनाट्य अण्णा भाऊ साठे 'लोकशाहीर' आहेत, याची साक्ष देते. यातील 'जग बदल घालुनी घाव। सांगून गेले मज भीमराव' या सुप्रसिद्ध गीतामुळे जनसामान्यांच्या मनात अण्णा भाऊ साठे शाहिरी परंपरेतील महत्त्वाचे शाहीर म्हणून निवास करू लागले.

अण्णा भाऊ साठे यांच्या लोकनाट्यांत हिंसाचार, अत्याचार यांचा नेहमीच धिक्कार केलेला दिसून येतो. त्यांचा नैतिकतेवर दृढ विश्वास आहे. अन्याय-अत्याचाराचा प्रतिकार करा; परंतु त्यानेच आणि तसाच केला पाहिजे, हे त्यांना मान्य नव्हते. स्वत:वर अन्याय-अत्याचार होऊ देऊ नका आणि तो सहनही करू नका आणि दुसऱ्यावर अन्याय-अत्याचार करू नका, अशी मांडणी करणारे अण्णा भाऊ आहेत. समाजातील अन्याय-अत्याचार, दुष्ट रूढी नष्ट करण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यातून 'देशभक्त घोटाळे' यातील गीत 'जग बदल घालुनी घाव। सांगून गेले मज भीमराव' यातील 'घाव' हा कोण्या व्यक्तीवर नसून, अनिष्ट रूढी, प्रथा-परंपरांवर आहे. नैतिकता मानणारे अण्णा भाऊ साठे देशाचे स्वातंत्र्य, देशप्रेम, स्त्रीचे शील, पुरुषांचा स्वाभिमान, मानवाची प्रतिष्ठा यांची आपल्या साहित्यातून पेरणी केली.

'जे मी जगलो, भोगलो, जे मी अनुभवलो, तेच मी लिहितो आहे,' असे ते म्हणतात. म्हणून त्यांच्या लोकनाट्यातून बहुजन समाजाच्या रंजनाचा तमाशा अवतरला. त्यातून पारंपरिक तमाशाचे अंतरंग बदलून त्यांनी नवीन मांडणी केली. जनसामान्यांच्या मनावर प्रत्यक्ष परिणाम करणाऱ्या लावणीतून आणि सोंगाड्यातून त्यांनी प्रबोधन करण्याचे कार्य केले. अण्णा भाऊ साठे यांच्या लोकनाट्याचे सर्व जनतेत म्हणजेच खेड्यापाड्यात प्रयोग झाले आणि ग्रामीण जनतेला पटेल, पचेल, रूचेल अशा भाषेत त्यांचेच प्रश्न, समस्या अण्णा भाऊंनी लोकनाट्यातून मांडल्या. म्हणून अण्णा



Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-81-937477-0-4


भाऊ साठे यांना लोकनाट्यकार, लोकनाट्याचे जनक, लोकनाट्य निर्मितीतील मैलाचा दगड असे म्हणणे काही वावगे ठरणार नाही.

अण्णा भाऊ साठे यांनी 'इनामदार' या नाटकाची रचना केली. गीत, संगीत आणि नाट्यात्मक शैलीचा अवलंब केल्यामुळे हे नाटक मनोरंजनाबरोबरच प्रबोधनही करते. या नाटकाची भाषा ही साधी, सरळ, सोपी, लोकांच्या परिचयाची असल्याने, ती लोकांना जवळची वाटते. त्यामुळे नाटक कुठेही जरी सादर केले, तरी ते पाहण्यासाठी प्रेक्षक जमा होतात. म्हणून अण्णा भाऊ साठे यांच्या लोकनाट्याचे हे वैशिष्ट्य आहे की, रंगमंच, नेपथ्य, रंगभूमी किंवा सभागृहाचीच नाट्याला आवश्यकता नाही, तर ते कोठेही म्हणजे मोकळ्या मैदानात, पारावर, झाडाखाली, फार थोड्या कलावंतांच्या मदतीने ते सादर केले, तरी ते आपलेच वाटते. त्यातील सुटसुटीतपणा हा नाटक सादर करण्यासाठीचे बंधन आणत नाही. त्यामुळे लोकनाट्यनिर्मितीत अण्णा भाऊ साठे यांचा साधेपणातून प्रबोधन करण्याचा बाज प्रेक्षक-रसिकांना आपला आणि जवळचा वाटतो. म्हणून अण्णा भाऊ साठे यांची लोकनाट्ये ही प्रसिद्ध झालेली दिसून येतात.

**संदर्भ :**

१. मच्छिंद्र सकटे : 'अण्णा भाऊ साठे- एक सत्यशोधक', प्रज्ञा प्रकाशन, कोल्हापूर.
२. डॉ. बाबूराव गुरव : 'अण्णा भाऊ साठे : समाजविचार आणि साहित्यविवेचन', लोकवाङ्मय.
३. दत्ता भगत : 'दलित नाटक'.
४. अण्णा भाऊ साठे : 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे : निवडक वाङ्मय', (संपा.) अर्जुन डांगळे.
५. शंकर भाऊ साठे : 'माझा भाऊ अण्णा भाऊ', विद्यार्थी प्रकाशन.



Scanned with OKEN Scanner